"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार"

- शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे

**Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha, Kolhapur**

# Dattajirao Kadam Arts, Science and Commerce College, Ichalkaranji

# LIBRARY

## Newspaper Clippings

## 2021-22 – PART 3

सकाळ
सोमवार, २१ मार्च २०२२

# विद्यार्थ्यांनी गावाशी ऋणानुबंध ठेवावेत

## शुभांगी गावडे; डीकेएएससी महाविद्यालयाचे रूईमध्ये श्रमसंस्कार शिबिर

इचलकरंजी, ता. २० : श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपल्या कामातून गावाबरोबर ऋणानुबंध तयार केला पाहिजे. ज्ञान व विज्ञान तसेच सुसंस्कार प्रत्यक्ष जीवनात दिसायला हवेत. त्यामुळेच समाजाला दिशा देणारे आदर्श व्यक्तिमत्त्व निर्माण होतील, असे मत श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सचिव शुभांगी गावडे यांनी व्यक्त केले. रुई (ता. हातकणंगले) येथे 'डीकेएएससी'च्या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या.



रुई : डीकेएएससीच्या महाविद्यालयाच्या श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना सौ. शुभांगी गावडे.

प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत शिबिराचे उद्घाटन झाले. जिल्हा परिषदेचे सदस्य राहुल आवाडे, हातकणंगले पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक के. एन. पाटील, सरपंच करिष्मा मुजावर, उपसरपंच युनूस मुजावर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे अध्यक्षस्थानी होते. सात दिवसांच्या श्रमसंस्कार शिबिरात 'माझे गाव, कोरोनामुक्त गाव' हे ध्येय समोर ठेवून स्वच्छता उपक्रम, श्रमदानासह विविध समाजोपयोगी व्याख्याने व प्रबोधनाचे आयोजन केले आहे. एनएसएस विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. ए. एस. कटकोळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.

प्रा. डॉ. सुनीता वेल्हाळ यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डी. जे. मुंगारे, प्रा. डॉ. सुभाष इंगळे, प्रा. डॉ. सुनील बेंद्रे आदी उपस्थित होते. प्रा. डॉ. सौ. पी. के. वाघमारे यांनी आभार मानले.

Scanned with CamScanner

सकाळ

गुरुवार,
२४ मार्च २०२२

## अवतीभवती



रूई : डीकेएएससी महाविद्यालयाने जागतिक जल दिनानिमित्त जनजागृती फेरी काढली.

# डीकेएएससी महाविद्यालयातर्फे जलदिनानिमित्त जनजागृती फेरी

इचलकरंजी : रुई (ता. हातकणंगले) येथे डीकेएएससी महाविद्यालयाने जागतिक जल दिनानिमित्त जनजागृती फेरी काढली. विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या निमित्ताने गावातील नागरिकांना पाण्याचे महत्त्व पटवून दिले. पाणी आडवा, पाणी जिरवा यासह विविध घोषणा देत गावातील सर्व भागांतून फेरी काढली. कार्यक्रम अधिकारी प्रा. अरुण कटकोळे, प्रा. डी. जे. मुंगारे, प्रा. विशाल कांबळे, प्रा. डॉ. सौ. पी. के. वाघमारे आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ

शुक्रवार,
२५ मार्च २०२२



इचलकरंजी : आंतरविद्यापीठ स्पर्धेत पदकप्राप्त डीकेएएससी महाविद्यालयाच्या खेळाडूंचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे.

# डीकेएएससी महाविद्यालयाचे कयाकिंग स्पर्धेत यश

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कयाकिंग स्पर्धेत उल्लेखनीय यश प्राप्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या संघाचे नेतृत्व करत तीन जणांनी पदक खेचून आणले. चंदीगढ येथील पंजाब विद्यापीठात झालेल्या या स्पर्धेत के २ प्रकारात करण घोडके व पवन कोळी यांनी रौप्यपदक, तर के ४ प्रकारात कौस्तुभ कोपार्डे याने कास्य पदक मिळवले. खेळाडूंचा सत्कार प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्या हस्ते केला. शारीरिक शिक्षण संचालक प्रा. मेजर मोहन वीरकर, प्रा. मुझफ्फर लगिवाले, प्रा. पी. एम. कांबळे, जयकुमार करके यांचे मार्गदर्शन लाभले.

Scanned with CamScanner

सकाळ
सोमवार,
२८ मार्च २०२२

# समाजाच्या प्रश्नांचे समाधान शोधावे

## प्राचार्य डॉ. ढेकळे; रुईतील डीकेएएससी महाविद्यालयात श्रमसंस्कार शिबिर



रुई : डीकेएएससी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप समारंभात बोलताना प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे.

**इचलकरंजी, ता. २७ :** शिबिरे ही राष्ट्र निर्माण करण्याचे कार्य करतात. हीच समाजाला श्रमाची प्रतिष्ठा देणारी जिवंत कार्यशाळा आहे. गावचा आदर्श हा सहजीवनाला व बंधुत्वाला चालना देणारा असतो. त्यामुळे आताच्या तरुणाईने समाजाच्या प्रश्नांचा अभ्यास करून त्यात समाधान शोधले पाहिजे, असे मत प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी व्यक्त केले. रुई (ता. हातकणंगले) येथील डीकेएएससी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप समारंभात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

प्रमुख पाहुणे म्हणून उद्योगपती भाऊसाहेब खारगे उपस्थित होते. सरपंच सौ. करिष्मा मुजावर, उपसरपंच युनूस मुजावर, पोलिसपाटील नितेश तराळ, ग्रामसेवक विठ्ठल कांबळे, जवाहर कारखान्याचे संचालक अभयकुमार काश्मिरे यांची प्रमुख उपस्थिती होती. महाविद्यालयांनी ग्रामीण भागात विशेष शिबिरे आयोजित करणे व श्रमदान करणे ही अतिशय महत्त्वाची बाब आहे. शिबिरामुळे मुलांमध्ये विद्यार्थीदशेपासूनच श्रमाची प्रतिष्ठा निर्माण होण्यास मदत होणार आहे, असे मत हातकणंगले पंचायत समितीचे उपसभापती अजीम मुजावर यांनी व्यक्त केले. अधिकारी प्रा. ए. एस. कटकोळे यांनी केले. आदर्श विद्यार्थिनी धनया पाटणकर व ऋषिकेश ढवळे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार केला. विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. सुनीता वेल्हाळ यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डी. जे. मुंगारे यांनी आभार मानले. प्रा. डॉ. सुभाष इंगळे, प्रा. डॉ. सुनील बेंद्रे, प्रा. डॉ. सौ. पी. के. वाघमारे आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

सकाळ

सोमवार,
२८ मार्च २०२२

# 'डीकेएएससी'मध्ये कार्यशाळा

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात ग्रंथालय कार्यशाळा झाली. ग्रंथालय विभागातर्फे अग्रणी महाविद्यालयांतर्गत 'व्यक्तिमत्त्व विकासात ग्रंथालयाची भूमिका' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा आयोजित केली होती. शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्राच्या संचालिका डॉ. नमिता खोत यांनी व्यक्तिमत्त्व विकासासाठी काय वाचन केले पाहिजे, याविषयावर मार्गदर्शन केले. उप-ग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार, यांनी व्यक्तिमत्त्व विकासात ग्रंथालयाचा कसा भरपूर उपयोग करावा याविषयी सांगितले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. स्वागत, प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख ग्रंथपाल विजय यादव यांनी करून दिली. प्रा. डॉ. पद्मश्री वाघमारे यांनी आभार मानले. डॉ. रेश्मा सनदी व प्रा. सौरभ मोरे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डी. ए. यादव, डॉ. एस. टी. इंगळे आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

सकाळ

कोल्हापूर, गुरुवार,
३१ मार्च २०२२ १




इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यशाळेत बोलताना डॉ. युवराज मोटे.

# डीकेएएससी महाविद्यालयात कार्यशाळा

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत 'नैसर्गिक आपत्तीमध्ये रासेयोच्या स्वयंसेवकाची भूमिका' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा झाली. शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय, श्री विजयसिंह यादव आर्टस् अँड सायन्स कॉलेज क्लस्टर योजनेअंतर्गत ही कार्यशाळा घेतली. प्रा. अरुण कटकोळे यांनी प्रास्ताविक केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. प्रमुख वक्ते भूगोलपर्यावरणीय तज्ज्ञ डॉ. युवराज मोटे यांनी निसर्ग का बदलतो, पाऊस महापूर महामारी, कोरोना तसेच शाश्वत विकासाची १७ उद्दिष्ट्ये याबाबत मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात प्रा. डी. ए. यादव यांनी आपत्तीमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकाची कर्तव्ये विशद केली. डॉ. डी. सी. कांबळे, डॉ. एस. टी. इंगळे, प्रा. डी. जे. मुंगारे, डॉ. बेंद्रे, प्रा. विशाल कांबळे आदी उपस्थित होते. डॉ. सौ. पी. के. वाघमारे यांनी आभार मानले.

Scanned with CamScanner

२ पुढारी MY इचलकरंजी गुरुवार, ३१ मार्च २०२२

संक्षिप्त

## 'डीकेएएससी'चे श्रमसंस्कार शिबिर

**रुई : पुढारी वृत्तसेवा**

इचलकरंजी येथील डीकेएएससी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे श्रमसंस्कार शिबिर येथे पार पडले. समारोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. प्रमुख पाहुणे म्हणून महादेव खारगे, महादेव कमलाकर, शकील मुजावर, सचिन लाड, भाऊसो फास्के उपस्थित होते. कार्यक्रम अधिकारी प्रा. ए. एस. कटकोळे यांनी स्वागत केले. यावेळी सरपंच सौ. करिष्मा मुजावर, उपसरपंच युनूस मुजावर, पोलिस पाटील नितेश तराळ, ग्रामसेवक विठ्ठल कांबळे, प्रा. डॉ. सुभाष इंगळे आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

सकाळ TODAY
सोमवार, ११ एप्रिल २०२२
२

# व्यापार महोत्सवातून आत्मविश्वास

## सुनील पाटील; डीकेएएसी महाविद्यालयात व्यापार महोत्सव




**इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात व्यापार महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी सुनील पाटील, प्रा. व्ही. एस. वांद्रे, प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे आदी.**

इचलकरंजी, ता. १० : येथील डीकेएएससी महाविद्यालयात कॉमर्स विभागातर्फे विद्यार्थ्यांना व्यापाराची संधी उपलब्ध करून दिली. व्यापार महोत्सवाचे उद्घाटन महाविद्यालय स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य व सन्मती बँकेचे चेअरमन सुनील पाटील यांनी केले. व्यापार महोत्सवातून विद्यार्थी-विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास व कौशल्य निर्माण होते. कलागुणांना व व्यक्तिमत्त्व विकासाला वाव मिळण्यासाठी हे एक उत्तम व्यासपीठ असल्याचे प्रमुख पाहुणे प्रा. व्ही. एस. वांद्रे यांनी सांगितले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. व्यापार महोत्सवातून प्लास्टिकमुक्तीचा संदेश दिला. यामध्ये गारमेंट वस्तू, सौंदर्यप्रसाधने, इमिटेशन ज्वेलरी, घरगुती वापराच्या वस्तू, सेंद्रिय पदार्थ, पोर्ट्रेट्स व हस्तकला, विविध खाद्यपदार्थ असे सुमारे अठरा स्टॉल्स होते. यामध्ये महाविद्यालयातील विद्याशाखेतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. महोत्सवाला माजी विद्यार्थ्यांनीही भेट दिली. प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी या व्यापार महोत्सवाचा आनंद घेतला. महोत्सवाचे नियोजन विभागप्रमुख प्रा. व्ही. पी. पाटील, प्रा. डॉ. रिता रॉड्रिक्स, प्रा. जी. एम. डिसोजा, प्रा. संपदा पांढरपट्टे, प्रा. मृणाली पाटील यांनी केले.

Scanned with CamScanner

लोकमत । सोमवार ११.४.२०२२

## 'डीकेएएससी'त व्यापार महोत्सव

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात व्यापार महोत्सवाचे आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. यावेळी व्ही. एस. वांद्रे यांची प्रमुख उपस्थिती होती. सन्मती बँकेचे अध्यक्ष सुनील पाटील यांनी उद्घाटन केले. महोत्सवात गारमेंट वस्तू, सौंदर्य प्रसाधने, इमिटेशन ज्वेलरी, घरगुती वापराच्या वस्तू, विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल्स होते.

Scanned with CamScanner

तरुण भारत    सोमवार, ११ एप्रिल २०२२



इचलकरंजी : येथील डीकेएएससी महाविद्यालयातील व्यापार महोत्सवानिमित्त उपस्थित माजी नगरसेवक सुनील पाटील, प्रा. व्ही. एस. वांद्रे आदी.

# डीकेएएससी महाविद्यालयात व्यापार महोत्सव

प्रतिनिधी
इचलकरंजी

येथील डीकेएएससी महाविद्यालयात कॉमर्स विभागाच्यावतीने व्यापार महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. व्यापार महोत्सवाचे उद्घाटन महाविद्यालयाच्या स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य व सन्मती बँकेचे चेअरमन सुनील पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी कॉमर्स विभागाचे माजी विभागप्रमुख प्रा. व्हि. एस. वांद्रे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी बोलताना सुनील पाटील यांनी विद्यार्थीदशेतील जुन्या आठवणींना उजाळा दिला. या महोत्सवातून विद्यार्थी-विद्यार्थिनीमध्ये आत्मविश्वास व कौशल्य निर्माण होईल असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

प्रा वांद्रे बोलताना म्हणाले, विद्यार्थी-विद्यार्थिनीच्या कलागुणांना व व्यक्तिमत्व विकासाला वाव मिळण्यासाठी ट्रेड फेअर हे एक उत्तम व्यासपीठ आहे. प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी मनोगत व्यक्त केले. महोत्सवातून प्लास्टिकमुक्तीचा संदेशही देण्यात आला. या महोत्सवात गारमेंट वस्तू, सौंदर्यप्रसाधने, इमिटेशन ज्वेलरी, घरगुती वापराच्या वस्तू, सेंद्रिय पदार्थ, पोर्ट्रट्स व हस्तकला, विविध खाद्यपदार्थ असे जवळपास १८ स्टॉल्स होते. या महोत्सवाला माजी विद्यार्थ्यांनीही भेट दिली.

महाविद्यालयाच्या सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींनी व्यापार महोत्सवाचा आनंद घेतला. महोत्सवाचे नियोजन विभागप्रमुख प्रा. व्हि. पी. पाटील, प्रा. डॉ. रिता रॉड्रिक्स, प्रा. जी. एम. डिसोजा, प्रा. संपदा पांढरपट्टे, प्रा. मृणाली पाटील यांनी केले. सेवानिवृत्त प्रा. विलास पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्या मार्गदर्शन लाभले.

SSK / BKP

Scanned with CamScanner

पुढारी
शुक्रवार, १५ एप्रिल २०२२




कोल्हापूर : विश्वात्मक साहित्य संमेलनात प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांना संत जीवन गौरव पुरस्कार प्रदान करताना न्यायमूर्ती मदन महाराज गोसावी, महंत ऋषिवरानंद, चे[illegible]ंद महाराज आदी.

# प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांना 'संत जीवन गौरव' पुरस्कार प्रदान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विश्वात्मक साहित्य संमेलन आयोजन समितीतर्फे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांना न्यायमूर्ती मदन महाराज गोसावी, महंत ऋषिवरानंद, चेतनानंद महाराज यांच्या हस्ते संत जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

अमरवाणी इव्हेंटस् फाऊंडेशन, पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र उदयपूर, संस्कृती मंत्रालय व इंडस्मून मीडियातर्फे महासैनिक दरबार कोल्हापूर येथे आयोजित पहिल्या संत विश्वात्मक साहित्य संमेलनात वारकरी पगडी, विठ्ठल-रुक्मिणीची प्रतिकृती, ग्रंथ देऊन प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी राज्यपाल महामहिम भगतसिंग कोश्यारी उपस्थित होते.

यावेळी संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे, डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे, मारुती महाराज करेकर, अल्जेरियाचे झरकी एड्डा, युगांडाच्या अलिसन नुबाम्पायर, इरफान मोहम्मद अली, पुनेह खाजेह, हसनी रबारी, डॉ. जितेंद्र इनामदार, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर.आर.कुंभार उपस्थित होते.

Scanned with CamScanner

लोकमत

शनिवार १६.४.२०२२

## डीकेएएससीमध्ये कार्यशाळा

इचलकरंजी : येथील डीकेएएससीमध्ये 'बौद्धिक संपदा हक्क' या विषयावर कार्यशाळा झाली. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. कार्यशाळेत अमोल पाटील (मुंबई) यांनी मार्गदर्शन केले. डॉ. ए. ए. घारे यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमास प्राध्यापक व विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. प्रा. एस. बी. फडतरे यांनी सूत्रसंचालन व डॉ. अतिश पाटील यांनी आभार मानले.

Scanned with CamScanner

सकाळ TODAY
रविवार, १७ एप्रिल २०२२



इचलकरंजी : राष्ट्रीय योगा स्पर्धेत पदकप्राप्त खेळाडूंचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे.

## एससी महाविद्यालयाचे यश

**इचलकरंजी :** दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयातील दोन खेळाडूंनी राष्ट्रीय योगा स्पर्धेत यश मिळवले. अमदाबाद (गुजरात) येथे झालेल्या स्पर्धेत मुलांच्या गटात मनन कासलिवाल याने तीन सुवर्णपदक पटकावले. मुलींच्या गटात सानिका जाधवने कास्यपदक व रौप्यपदक मिळवले. दोघेही शिवाजी विद्यापीठाच्या संघात सहभागी झाले होते. त्यांची खेलो इंडिया स्पर्धेसाठी निवड झाली आहे. प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्या हस्ते सत्कार केला. त्यांना प्रा. मेजर मोहन विरकर, प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. प्रशांत कांबळे आदींचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

सकाळ » TODAY

सोमवार, १८ एप्रिल २०२२




इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात बौद्धिक संपदा हक्क कार्यशाळेत बोलताना प्रा. अमोल पाटील. व्यासपीठावर मान्यवर.

# 'बौद्धिक संपदा हक्क' वर 'डीकेएएस'मध्ये कार्यशाळा

इचलकरंजी, ता. १७ : येथील डीकेएएससी महाविद्यालयात बौद्धिक संपदा हक्क, या विषयावर कार्यशाळा झाली. रिसर्च प्रमोशन अँड मॉनिटरिंग कमिटीतर्फे कार्यशाळा झाली. प्रा. अमोल पाटील (मुंबई) यांनी बौद्धिक संपदा हक्क याविषयी मार्गदर्शन केले. बौद्धिक संपदा, बौद्धिक संपदाचे प्रकार, बौद्धिक संपदा हक्काची गरज आणि महत्त्व हे विषय समजावून सांगितले. कॉपीराइट, औद्योगिक रचना, ट्रेडमार्क, पेटंट अशा बौद्धिक संपदा हक्कासंबंधीच्या विविध प्रकारांचे विश्लेषण केले. कार्यशाळेतून संशोधकांना मार्गदर्शन मिळाले.

अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. संशोधन विशिष्ट नियमावलीमध्ये ना बसवण्यासाठी बौद्धिक हक्क संपदा याबाबतची जाणीव जागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने कार्यशाळा आयोजित केल्याचे प्राचार्य डॉ. ढेकळे यांनी सांगितले. प्रास्ताविकामध्ये समन्वयक डॉ. ए. ए. घारे यांनी बौद्धिक हक्क संपदा, या उपक्रमाचा उद्देश सांगितला. पाहुण्यांचा परिचय डॉ. दीपक कुंभार यांनी करून दिला. डॉ. अतिश पाटील यांनी आभार मानले. प्रा. एस. बी. फडतरे आणि प्रा. एस. एम. मत्तिवाड यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर, डॉ. डी. जी. घोडके, डॉ. सुनीता वेल्हाळ, डॉ. सुतार, डॉ. निलोफर शेख, डॉ. एस. टी. इंगळे, प्रा. डी. ए. यादव आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

तरुण भारत

सोमवार, १८ एप्रिल २०२२

# डीकेएएससीमध्ये 'बौद्धिक संपदा हक्क'वर कार्यशाळा

**इचलकरंजी :** येथील डीकेएएससीमध्ये रिसर्च प्रमोशन अँड मॉनिटरिंग कमिटीच्यावतीने बौद्धिक संपदा हक्कावर कार्यशाळा झाली. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे उपस्थित होते. कार्यशाळेत अमोल पाटील (मुंबई) यांनी बौद्धिक संपदा म्हणजे काय?, बौद्धिक संपदाचे प्रकार, बौद्धिक संपदा हक्काची गरज आणि महत्त्व सांगितले. तसेच कॉपीराईट, औद्योगिक रचना, ट्रेडमार्क, पेटंट अशा बौद्धिक संपदा हक्कासंबंधीच्या विविध प्रकारांचे विश्लेषण केले. प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी कोणतीही बौद्धिक संपदा एका विशिष्ट नियमावलीमध्ये बसवणे म्हणजे बौद्धिक हक्क संपदा याबाबतची जाणीव जागृती निर्माण व्हावी, हा कार्यशाळेचा उद्देश सफल होईल अशी अपेक्षा व्यक्त केली. प्रास्ताविक डॉ. ए. ए. घारे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. दीपक कुंभार यांनी करून दिला. आभार डॉ. अतिश पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. एस. बी. फडतरे, प्रा. एस. एम. मत्तीवाड यांनी केले. यावेळी प्रा. डॉ. आळवेकर, डॉ. घोडके, डॉ. वेल्हाळ, डॉ. सुतार, डॉ. शेख, डॉ. इंगळे, प्रा. यादव, प्रा. मुंगारे, डॉ. रॉड्रिक्स, प्रा. कांबळे, डॉ. वाघमारे, डॉ. सनदी, प्रा. स्वामी, प्रा. मोरे, प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

सकाळ

शुक्रवार,
२२ एप्रिल २०२२

... उपस्थित होते.

## अर्जुन जाधव यांची निवड


अर्जुन जाधव

**इचलकरंजी :** राज्याच्या मराठी समाजशास्त्र परिषदेच्या कार्यकारिणीत शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधी म्हणून प्रा. डॉ. अर्जुन जाधव यांची निवड केली. गोगटे जोगळेकर महाविद्यालय रत्नागिरी येथे झालेल्या परिषदेच्या अधिवेशनात नवीन कार्यकारिणी निवडली. यामध्ये डॉ. जाधव यांना डॉ. नारायण कांबळे यांच्या हस्ते निवडीचे पत्र दिले. विद्यापीठातून कार्यकारिणीत डॉ. जाधव यांची निवड झाली आहे. डॉ. जाधव हे सध्या डीकेएएससी महाविद्यालयात समाजशास्त्र विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. त्यांना स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे, सचिव सौ. शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे आदींचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

लोकमत

epaper.lokmat.com

कोल्हापूर, शनिवार, दि. २३ एप्रिल २०२२



उपस्थित होते.

## अनिकेत मानेची उत्तुंग भरारी

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयाचा विद्यार्थी अनिकेत माने याने ॲथलेटिक्समधील उंच



उडी प्रकारात उत्तुंग भरारी घेतली. त्याची भारतीय संघात निवड झाली आहे. त्याने २.०३ मीटर उंच उडी मारली आहे. अनिकेत याला प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांचे मार्गदर्शन लाभले.

Scanned with CamScanner

तरुण भारत

शनिवार, २३ एप्रिल २०२२

# डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी महोत्सवाची सांगता २९ रोजी

**कोल्हापूर :** शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी महोत्सवाची सांगता शुक्रवार, २९ एप्रिल रोजी सकाळी १०.३० वाजता अदृश्य काडसिद्धेश्वर महाराज यांच्याहस्ते होणार आहे. अध्यक्षस्थान छत्रपती शाहू महाराज भूषवणार आहेत. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे पेट्रन खासदार संभाजीराजे छत्रपती, अध्यक्ष आमदार चंद्रकांत पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. जास्तीत जास्त प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, उपाध्यक्ष नामदेव कांबळे, उपाध्यक्ष लालासाहेब यादव, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, सचिव प्राचार्य डॉ. राजेंद्र शेजवळ यांनी केले आहे.

Scanned with CamScanner

सकाळ TODAY

सोमवार,
२५ एप्रिल २०२२



इचलकरंजी : अनिकेत माने याचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे. शेजारी मान्यवर.

## अनिकेत मानेची निवड

इचलकरंजी : दत्ताजीराव कदम ए. एस. सी. महाविद्यालयाचा खेळाडू अनिकेत माने याने ॲथलेटिक्समधील उंच उडीत उत्तुंग भरारी घेतली आहे. भारतीय संघात त्याची निवड झाली. निवड चाचणीत त्याने २.०३ मीटर उंच उडी मारली. त्याची नेताजी सुभाषचंद्र बोस साई भारतीय खेल प्राधिकरण या प्रशिक्षण केंद्रात निवड झाली आहे. त्याबाबत प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्या हस्ते अनिकेत व त्याचे वडील सुभाष माने यांचा सत्कार झाला. निवड चाचणी संपूर्ण भारतातून केली गेली, आत्तापर्यंत अनिकेत याने १२ वर्षे, १४ वर्षे, १७ वर्षे, १८ वर्षे, प्रत्येक वयोगटामध्ये नॅशनल स्पर्धेमध्ये सुवर्णपदक मिळवले आहे. अनिकेत हा खेळातच पारंगत नसून अभ्यासातही खूप हुशार आहे. त्याची विद्यापीठाच्या संघामधून निवड झाली होती. आता बेंगलोर येथे होणाऱ्या तीन वर्षांच्या प्रशिक्षणासाठी त्याची निवड झालेली आहे. तीन वर्षांचे प्रशिक्षण शासनामार्फत दिले जाणार आहे. त्याला प्रा. मेजर मोहन विरकर, प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. प्रशांत कांबळे, जयकुमार करके यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

सकाळ TODAY

मंगळवार,
२६ एप्रिल २०२२



इचलकरंजी : येथील डीकेएएससी महाविद्यालयात जागतिक पुस्तक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे. शेजारी मान्यवर.

# 'डीकेएएससी'मध्ये पुस्तक दिन

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात जागतिक पुस्तक दिन साजरा केला. जागतिक पुस्तक दिन व प्रथितयश इंग्रजी साहित्यिक विल्यम शेक्सपियर यांच्या जयंतीनिमित्त इंग्रजी विभाग व ग्रंथालय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रंथालयात विल्यम शेक्सपियर यांच्या साहित्याचे ग्रंथप्रदर्शनही भरवले. ग्रंथप्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना प्रमुख पाहुणे डॉ. एस आय नुरानी यांनी इंग्रजी साहित्याचा अभ्यास करण्याचे आवाहन केले. प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक इंग्रजी विभागप्रमुख डॉ. सुनीता वेल्हाळ यांनी केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख डॉ. डी. जी. घोडके यांनी करून दिली. ग्रंथालय विभागप्रमुख व्ही. पी. यादव, सहाय्यक ग्रंथपाल आर. एस. चव्हाण, प्रा. एस. एस. हारगणे, प्रा. एम. डी. चेंडके, प्रा. नम्रता ताटे आदींनी कार्यक्रमाचे नियोजन केले. प्रा. डॉ. डी. सी. कांबळे, मेजर मोहन विरकर, डॉ. एकनाथ आळवेकर, प्रा. एस. टी. हराळे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन पौर्णिमा स्वामी यांनी केले.

CS Scanned with CamScanner

सकाळ

कोल्हापूर, शुक्रवार,
२९ एप्रिल २०२२

# 'डीकेएएससी'मध्ये पारितोषिक वितरण

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयातील वाङ्मय मंडळाच्या वतीने विविध स्पर्धांतील पारितोषिक वितरण झाले. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे, निबंध, वक्तृत्व, चित्रकला, टॅलेंट सर्च स्पर्धेतील व महाविद्यालयातील गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना पारितोषिके दिली. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. व्ही. एस. वांद्रे तर अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. कॉमर्स, वनस्पती शास्त्र, इतिहास या विषयांतील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना प्रा. वांद्रे, प्रा. डॉ. सी. आर. पाटील यांनी दिलेल्या रकमेतून रोख पारितोषिके दिली. स्वागत व प्रास्ताविक प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर यांनी केले. आभार डॉ. एस. बी. बेंद्रे यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. एस. जे. वेल्हाळ यांनी केले. डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव, प्रा. एस. टी. इंगळे आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

साप्ताहिक इचलकरंजी समाचार ● गुरुवार २८/४/२०२२ ●

## साहित्य माणसाला जगणे शिकवते-डॉ. व्ही. एस. ढेकळे

इचलकरंजी, दि. २४–साहित्य माणसाला जगणे शिकवते, मानसिक बळ देते म्हणून विविध प्रकारचे साहित्य ग्रंथ वाचले पाहिजेत असे मत डी.के .ए.एस.सी. महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी व्यक्त केले. महाविद्यालयात पुस्तकदिनानिमीत्त आयोजित साहित्याचे आजचे महत्त्व या विषयावर ते बोलत होते.

पुस्तकदिनानिमीत्त महाविद्यालयाच्या ग्रंथालयात विल्यम शेक्सपियर यांच्या साहित्याचे ग्रंथप्रदर्शनही आयोजित करण्यात आले होते. त्याचे उद्घाटन डॉ. एस आय नुरानी यांच्या हस्ते झाले. त्यांनी इंग्रजी साहित्याचा अभ्यास करण्याचे आवाहन केले.

यावेळी इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. सुनिता वेल्हाळ, डॉ. डी. जी.घोडके, ग्रंथालय विभाग प्रमुख व्हीं.पी. यादव, सहा. ग्रंथपाल आर.एस. चव्हाण, प्रा. एस.एस. हरगाने, प्रा. एम.डी.चेंडके, प्रा. नम्रता ताटे, पौर्णिमा स्वामी, डा. डी.सी. कांबळे, मेजर विरकर, डॉ. ई.बी. आळवेकर, प्रा. हराळे, डॉ. एस. बी. बेंद्रे , डॉ. व्हि.पी. शिंदे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ

कोल्हापूर, शनिवार,
३० एप्रिल २०२२

# कृतज्ञता, संवेदनशीलता हाच शिक्षणाचा गाभा

## अदृश्य काडसिद्धेश्वर महाराज; शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे जन्मशताब्दीची सांगता

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २९ : देश, समाज यांच्याप्रती कृतज्ञता आणि मनाची संवेदनशीलता निर्माण होणे हाच शिक्षणाचा गाभा आहे. यासाठी विद्यार्थ्यांना दर्शनशास्त्र आणि नीतीमूल्याचे शिक्षण दिले पाहिजे. विद्यार्थ्यांमधील अवगुण दूर करणे हेच शिक्षकाचे काम असून, त्यांच्यावर उत्तम नागरिक बनवण्याची जबाबदारी आहे, असे मत अदृश्य काडसिद्धेश्वर महाराज यांनी व्यक्त केले. शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे जन्मशताब्दी सांगता समारंभप्रसंगी शुक्रवारी ते बोलत होते. विवेकानंद महाविद्यालयाच्या प्रांगणात हा कार्यक्रम झाला. श्रीमंत शाहू महाराज छत्रपती हे अध्यक्षस्थानी होते.

सुरुवातीला महेश हिरेमठ आणि सहकाऱ्यांनी संस्थेची प्रार्थना आणि भजन सादर केले. त्यानंतर बापूजी साळुंखेंच्या जीवनावरील पोवाडा आझाद नायकवडी यांनी गायला. प्रास्ताविक श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी केले. संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ यांनी जन्मशताब्दी महोत्सवादरम्यान घेतलेल्या उपक्रमांचा आढावा घेतला. संस्थाध्यक्ष आमदार चंद्रकांत पाटील म्हणाले, 'कौशल्य विकास ही काळाची गरज आहे. येथून पुढे रोजगार आणि व्यवसाय करण्यासाठी कौशल्याची गरज असणार आहे. विवेकानंद संस्थेने याचा विचार करून नवे अभ्यासक्रम सुरू केले पाहिजेत. तसेच समाजात कौशल्याला प्रतिष्ठा मिळवून दिली पाहिजे.' काडसिद्धेश्वर महाराज म्हणाले, 'ब्रिटिशांनी १८३६ ला देशातील ७ लाख गुरुकुले बंद केली. त्यामुळे येथील शिक्षण आणि संशोधन थांबले. घरोघरी चालणारे कुटिरोद्योग बंद झाले. त्यासाठी आवश्यक असलेली कौशल्ये असणारी पिढी संपली. आधुनिक शिक्षणाच्या नावाखाली ज्या शाळा सुरू केल्या त्यातून आमच्या पिढ्या या कौशल्यहीन आणि आत्मकेंद्री बनल्या. यामुळे समाजाची अवनती झाली.'

संस्थेच्या सचिव शुभांगी गावडे, लालासाहेब गायकवाड, एस. एम. गवळी, नामदेवराव कांबळे, खासदार संजय पाटील, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे, हितेंद्र साळुंखे आदी उपस्थित होते.

### सर्वांना बरोबर घेऊन जाणारे हिंदुत्व

अध्यक्षीय भाषणात श्रीमंत शाहू महाराज छत्रपती म्हणाले, 'बापूजी साळुंखे यांनी संस्थेचे नाव स्वामी विवेकानंद ठेवले. यावरून त्यांच्या कार्याची दिशा आणि त्यांचे विचार काय होते हे लक्षात येते. विवेकानंदांनी शिकागो येथे सर्वांना बंधू आणि भगिनी संबोधून आपलेसे केले. त्यांचे हिंदुत्व सर्वांना बरोबर घेऊन जाणारे होते. आज वेगळेच हिंदुत्व सांगितले जात आहे. बहुजनांच्या मुलांना शिक्षण मिळण्यासाठी सुरू केलेल्या या संस्थेने समाजातील समतेचा विचार अधिक बळकट केला आहे.'



कोल्हापूर : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जन्मशताब्दी सांगताप्रसंगी बोलताना काडसिद्धेश्वर महाराज. शेजारी डावीकडून एस.एम.गवळी, नामदेवराव कांबळे, शुभांगी गावडे, चंद्रकांत पाटील, श्रीमंत शाहू महाराज, अभयकुमार साळुंखे, लालासाहेब यादव, डॉ.आर. व्ही. शेजवळ. (नितीन जाधवः सकाळ छायाचित्रसेवा)

Scanned with CamScanner



कोल्हापूर : जन्मशताब्दी महोत्सवात बोलताना काडसिद्धेश्वर महाराज. व्यासपीठावर एस. एम. गवळी, शुभांगी गावडे, शाहू महाराज, प्राचार्य अभयकुमार साळुंखे, लालासाहेब यादव, प्राचार्य राजेंद्र शेजवळ आदी. (छाया : पप्पू अत्तार)

# शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच नीतिमूल्यांना महत्त्व द्या : काडसिद्धेश्वर महाराज

## शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी महोत्सवाची सांगता

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

डीजिटल युगात शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच शिक्षकांनी नितिमूल्यांना महत्त्व दिल्यास आदर्श विद्यार्थी घडवता येईल, असे प्रतिपादन अदृश्य काडसिद्धेश्वर महाराज यांनी केले. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी महोत्सवाच्या सांगता समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शाहू महाराज होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष भाजपचे प्रदेशाध्यक्ष आ. चंद्रकांत पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

काडसिद्धेश्वर महाराज म्हणाले, बापूजी साळुंखे यांनीही शिक्षणात दूरदृष्टी ठेवून विद्यार्थ्यांना ज्ञानाबरोबरच जगण्याचा आदर्श वास्तुपाठ घालून दिला. त्यांच्या विचारांचे आचरण करूनच विवेकानंद शिक्षण संस्था मार्गक्रमण करत आहे. आदर्श शिक्षक कसा असावा, याचा वस्तुपाठ शिक्षणमहर्षी डॉ. बापूजींच्या तत्त्वज्ञानातून, कार्यातून आणि विचारातून व्यक्त होत आहे.

आ. चंद्रकांत पाटील म्हणाले, बदलत्या शिक्षण प्रणालीबरोबरच कौशल्य विकासावर आधारित अभ्यासक्रम सुरू केल्यास रोजगाराच्या नवनवीन संधी मिळू शकतात.

शाहू महाराज म्हणाले, समाजात जबाबदार नागरिक घडविण्यासाठी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी तळागाळात शिक्षणाचीगंगापोहोचवली. समाजसुधारकांच्या मूल्यांचा आदर्श ठेवून संस्थेने कार्य करावे. प्रास्ताविकात संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, 'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार' या हेतूने शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना केली.

प्राचार्य डॉ. राजेंद्र शेजवळ यांनी जन्मशताब्दी समितीच्या अहवालाचे वाचन केले. केंद्र शासनाने बापूजींना पद्म पुरस्कारानेसन्मानितकरावे, अशीभावना व्यक्त केली. याप्रसंगी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी महोत्सव स्मरणिकांचे प्रकाशन करण्यात आले. शाहीर आझाद नायकवडी यांनी पोवाडा सादर केला. संस्थेच्या सचिव प्राचार्या सौ. शुभांगी गावडे यांनी आभार मानले. सौ. शुभदा हिरेमठ व प्रा. महेश गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले.

Scanned with CamScanner

# संवेदनशील समाजनिर्मितीत बापूजींचे भरीव योगदान

## अदृश्य काडसिद्धेश्वर महाराज, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी महोत्सव सांगता समारंभ उत्साहात

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राष्ट्र, समाज व आई-वडिलांप्रती कृतज्ञता असायला हवी. आदर्श शिक्षक कसा असावा, याचा वस्तुपाठ शिक्षणमहर्षी डॉ. बापूजींच्या तत्त्वज्ञानातून, कार्यातून आणि विचारातून प्रतीत होतो, असे उद्‌गार कणेरी मठाचे मठाधिपती अदृश्य काडसिद्धेश्वर महाराज यांनी काढले. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी महोत्सवाच्या सांगता समारंभाच्या निमित्ताने ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी श्रीमंत शाहू छत्रपती महाराज होते.



कोल्हापूर : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जन्मशताब्दी महोत्सव सांगता समारंभात बोलताना अदृश्य काडसिद्धेश्वर महाराज. सोबत श्रीमंत शाहू छत्रपती महाराज, कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, अध्यक्ष चंद्रकांत पाटील, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे व संस्था पदाधिकारी. (छाया : अर्जुन टाकळकर)

प्रास्ताविक संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी केले. संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी महोत्सव स्मरणिका, अर्चना पानारी यांचा परिसस्पर्श, डॉ. विनोदकुमार वायचळ यांनी हिंदीत अनुवादित केलेला शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे (व्यक्तित्व एवं कार्य) आणि डॉ. मच्छिंद्र नांगरे यांचा डॉ. बापूजी साळुंखे आणि मराठवाडा या ग्रंथांचे प्रकाशन करण्यात आले. संस्थेतील नऊ शाळांना सर्वोत्कृष्ट शाखा व स्वच्छ सुंदर गुणवत्तेची शाळा पुरस्कार देण्यात आले.

प्रारंभ शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे, संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमा पूजन व संस्था प्रार्थनेने झाला. प्रा. महेश हिरेमठ यांनी भक्तिगीते सादर केली. शाहीर आझाद नायकवडी यांनी शिक्षणमहर्षी डॉ. साळुंखे यांच्या जीवनावर आधारित स्वरचित पोवाडा सादर केला. आभार सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे यांनी मानले. सूत्रसंचालन शुभदा हिरेमठ व प्रा. महेश गायकवाड यांनी केले.

यावेळी संस्थेचे सहसचिव (अर्थ) एस. एम. गवळी, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्यासह संस्थेचे आजी-माजी पदाधिकारी व १३ जिल्ह्यांतील ४०६ शाखांतील गुरुदेव कार्यकर्ते उपस्थित होते.

### पद्म पुरस्काराने सन्मान व्हावा

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य प्रेरणादायी आहे. त्याची दखल घेऊन केंद्र शासनाने बापूजींना पद्म पुरस्काराने सन्मानित करावे, अशी भावना महोत्सव समितीचे सचिव प्राचार्य डॉ. राजेंद्र शेजवळ यांनी व्यक्त केली.

Scanned with CamScanner

लोकमत
epaper.lokmat.com
कोल्हापूर, रविवार , दि. १ मे २०२२

# डीकेएएससीत पारितोषिक वितरण

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात विविध स्पर्धेतील पारितोषिक वितरण उत्साहात झाले. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. यावेळी प्रा. व्ही. एस. वांद्रे यांची प्रमुख उपस्थिती होती. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे, निबंध, वक्तृत्व, चित्रकला, टॅलेंट सर्च स्पर्धेतील विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. प्रा. एकनाथ आळवेकर यांनी स्वागत केले. यावेळी डी. सी. कांबळे, डी. ए. यादव, एस. टी. इंगळे आदी, उपस्थित होते. एस. जे. वेल्हाळ यांनी सूत्रसंचालन व एस. बी. बेंद्रे यांनी आभार मानले.

CS Scanned with CamScanner

सकाळ TODAY

शनिवार,
७ मे २०२२

## डीकेएएससी महाविद्यालय

शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्या हस्ते झाले. शाहू महाराजांच्या ग्रंथांचे प्रदर्शन भरविण्यात आले. प्रा. अरूण कटकोळे यांचे व्याख्यान झाले. डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव, प्रा. एकनाथ आळवेकर, मेजर मोहन वीरकर, प्रा. विशाल गोडबोले, प्रा. भारती कोळेकर आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ
शनिवार,
२१ मे २०२२




इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये विद्यार्थिनींसाठी आयोजित स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबिरात बोलताना प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे.

# डीकेएएससी कॉलेजमध्ये विद्यार्थिनींसाठी स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण

**इचलकरंजी :** डीकेएएससी कॉलेजमध्ये विद्यार्थिनींसाठी स्वसंरक्षणासाठीचे प्रशिक्षण आयोजित केले. महिला सबलीकरण समिती आणि अंतर्गत तक्रार निवारण समिती, तसेच इंडियन मार्शल आर्ट, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर घेतले. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. प्राचार्य डॉ. ढेकळे, मार्गदर्शक सतीश वडणगेकर यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक व स्वागत प्रा. डॉ. ए. ए. घारे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. वेल्हाळ यांनी करून दिला. डॉ. पी. के. वाघमारे यांनी आभार मानले. प्रा. एस. बी. फडतारे, प्रा. एस. एस. पुजारी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एन. एच. शेख, डॉ. रेश्मा सनदी, प्रा. अक्षता खेडकर आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ
बुधवार,
२५ मे २०२२

# कदम महाविद्यालयात नेट-सेट मार्गदर्शन

**इचलकरंजी, ता. २४ :** येथील दत्ताजीराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात पदव्युत्तर मराठी विभागातर्फे नेट-सेट मार्गदर्शन कार्यशाळा झाली. महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा आणि समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. अर्जुन जाधव यांनी मार्गदर्शन केले. प्रा. जाधव यांनी पदव्युत्तर पदवीनंतरची पीएच.डी.ची प्रवेश परीक्षा, तसेच संशोधन छात्रवृत्ती याबद्दल माहिती सांगितली.

पदव्युत्तर मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रा. बी. एस. कोळेकर यांनी आभार मानले. प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळा झाली. कार्यशाळेस पदव्युत्तर विभागाचे आजी-माजी विद्यार्थी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ

बुधवार,
२५ मे २०२२

# 'डीकेएएससी' महाविद्यालयात कार्यशाळा

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयात गणित विभागातर्फे एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेचे प्रमुख वक्ते प्रो. उमाकांत आवटी होते. त्यांनी मॅथेमॅटिक्स इन नेचर या विषयावर मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळा पार पडली. डॉ. सागर सुतार यांनी प्रास्ताविक केले. प्रा. वृषाली हतगीं आणि प्रा. अमृता पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. द. जा. मुंगारे यांनी आभार मानले. या वेळी प्राध्यापक, विद्यार्थी वर्ग उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ

कोल्हापूर, गुरुवार,
२६ मे २०२२

# इचलकरंजीची 'म्हातारा पाऊस' सर्वोत्कृष्ट

## रसवंती करंडक स्पर्धा : पुणे येथे झालेल्या स्पर्धेत मुंबईच्या 'जनावर' द्वितीय

कोल्हापूर, ता. २५ : ॲड. योगेश दिलीपराव नाईक प्रस्तुत आणि न्यू नटराज थिएटर्स पुणे आयोजित 'रसवंती करंडक' या राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेत इचलकरंजीच्या दत्ताजीराव कदम कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेली 'म्हातारा पाऊस' ही एकांकिका सर्वोत्कृष्ट ठरली. प्राण मुंबई यांची 'जनावर' ही एकांकिका दुसरी आली असून 'भगदाड' ही डोंबिवलीच्या स्वामी नाट्यांगणची एकांकिका तिसऱ्या क्रमांकावर आली आहे.



पुणे : राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेत सर्वोत्कृष्ट ठरलेल्या इचलकरंजीच्या 'म्हातारा पाऊस' एकांकिकेतील कलाकार मान्यवरांच्या हस्ते करंडक स्वीकारताना.

'रसवंती करंडक' राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा नुकतीच बालगंधर्व रंगमंदिर येथे झाडली. स्पर्धेत पारितोषिक वितरण वेळी अप्पर पोलिस आयुक्त राजेंद्र डहाळे, पोलिस उपायुक्त परिमंडल १ च्या ननावरे मॅडम, सहायक पोलिस आयुक्त रमाकांत माने (विश्रामबाग विभाग), आयएएस अधिकारी राजा, वरिष्ठ पोलिस निरीक्षक मुरलीधर करपे (डेक्कन विभाग), ॲड. प्रतापराव परदेशी, अखिल भारतीय महामंडळचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले, दिग्दर्शक, अभिनेते चेतन चावडा, निर्माति किरण कुमावत, ऑल इंडिया जर्नालिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष समीर देसाई, ॲड. शिवराज कदम, ॲड. योगेश दिलीपराव नाईक आदी उपस्थित होते.

मेघराज राजेभोसले म्हणाले, ''पुण्यामध्ये अनेक वर्षापासून भरवल्या जात असलेल्या स्पर्धेमुळे उदयोन्मुख कलाकारांना व्यासपीठ मिळते. अशा स्पर्धांमधून चित्रपटसृष्टीला वेगवेगळे कलाकार मिळावेत हीच अपेक्षा.''

स्पर्धेत सिद्धेश नलावडे (बबन), स्वामी नाट्यांगण, डोंबिवली (भगदाड), स्त्री अभिनय प्राची जाधव (बाय), क्रावूड फिल्म्स, डोंबिवली, ध्वनी पार्श्व संगीत मिहीर कदम, आयुष पवार, प्राण मुंबई (जनावर), नेहा पाटील, संध्या कांबळे दत्ताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी (म्हातारा पाऊस) यांना गौरवण्यात आले. प्रकाश योजनेत पहिला मॉडर्न कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, पुणे (अस्थिकलश), दुसरा क्रमांक प्राण मुंबई (जनावर) तर नेपथ्यमध्ये प्राण मुंबई (जनावर) यांनी पहिला क्रमांक पटकावला.

### अन्य विजेते असे

स्त्री अभिनय : प्रथम : समीक्षा संकपाळ (म्हातारी), दत्ताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी (म्हातारा पाऊस), द्वितीय : मानसी कोंढाळकर (वानरीन), प्राण मुंबई (जनावर), पुरुष अभिनय : प्रथम : महेश गवंडी (म्हातारा) व दत्ताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी (म्हातारा पाऊस), द्वितीय : सुनील शिंदे (अमन), जेधे महाविद्यालय, पुणे (अमन), लेखक : नचिकेत श्रीकांत दांडेकर, कलरफूल मॉक, (टिनीटस), दिग्दर्शन : प्रथम : कादंबरी माळी, दत्ताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी (म्हातारा पाऊस), द्वितीय : आकाश रुके, ऋषिकेश जाधव, प्राण मुंबई (जनावर).

Scanned with CamScanner

लोकमत
epaper.lokmat.com
कोल्हापूर, गुरुवार, दि. २६ मे २०२२

## एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात झाली. यावेळी उमाकांत आवटी यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी मॅथेमॅटिक्स इन नेचर या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. सागर सुतार यांनी प्रास्ताविक केले. यावेळी प्राचार्य डॉ.व्ही.एस.ढेकळे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. अमृता पाटील यांनी सूत्रसंचालन केले. द.जा.मुंगारे यांनी आभार मानले.

Scanned with CamScanner

दैनिक **महासत्ता** गुरूवार, ता.२६ मे २०२२

# इचलकरंजीची 'म्हातारा पाऊस' ठरली सर्वोत्कृष्ट एकांकिका

**कोल्हापूर,ता.२५(प्रतिनिधी)-**

अॅड. योगेश दिलीपराव नाईक प्रस्तुत आणि न्यू नटराज थिएटर्स पुणे आयोजित 'रसवंती करंडक' या राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचा निकाल जाहीर झाला आहे. यामध्ये दत्ताजीराव कदम कॉलेज इचलकरंजीने बाजी मारली असून त्यांची 'म्हातारा पाऊस' ही एकांकिका सर्वोत्कृष्ट ठरली आहे. प्राण मुंबई यांची 'जनावर' ही एकांकिका दुसरी आली असून 'भगदाड' ही स्वामी नाट्यांगण, डोंबिवली यांची एकांकिका तिसऱ्या क्रमांकावर आली आहे. 'रसवंती करंडक' राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा नुकतीच बालगंधर्व रंगमंदिर येथे उत्साहात पार पडली. स्पर्धेत पारितोषिक वितरण वेळी अप्पर पोलिस आयुक्त राजेंद्र डहाळे, पोलिस उपायुक्त ननावरे मॅडम, सहाय्यक पोलिस आयुक्त रमाकांत माने, आयएएस अधिकारी . राजा, वरिष्ठ पोलिस निरीक्षक मुरलीधर करपे , अॅड. प्रतापराव परदेशी, मेघराज राजेभोसले, चेतन चावडा, किरण कुम्हावत, समीर देसाई, अॅड. शिवराज कदम, अॅड. योगेश दिलीपराव नाईक आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

लोकमत
epaper.lokmat.com
कोल्हापूर, गुरुवार, दि. २६ मे २०२२

## नेट-सेट मार्गदर्शन

इचलकरंजी : येथील कन्या महाविद्यालयात पदव्युत्तर मराठी विभागातर्फे नेट-सेट मार्गदर्शन कार्यशाळा झाली. डॉ. अर्जुन जाधव यांनी मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर यांनी स्वागत केले. कार्यशाळेस पदव्युत्तर विभागाचे आजी-माजी विद्यार्थी उपस्थित होते. बी.एस.कोळेकर यांनी आभार मानले.

Scanned with CamScanner

सकाळ
सोमवार, ३० मे २०२२



इचलकरंजी : दत्ताजीराव कदम एएससी कॉलेजच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करताना एम. एन. वाघमोडे, पै. अमृत भोसले, प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे आदी.

# इचलकरंजीच्या लौकिकात गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांमुळे भर

## पोलिस निरीक्षक वाघमोडे; एएससी कॉलेजमध्ये पारितोषिक वितरण

इचलकरंजी, ता. २९ : यशस्वी विद्यार्थी हे इतरांसमोर आदर्श ठरत असतात. महाविद्यालयीन जीवनात प्रत्येक विद्यार्थ्याने संयमाने पुढे गेले पाहिजे. शैक्षणिक क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या इचलकरंजीच्या लौकिकात आता गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांमुळे भर पडत आहे, असे प्रतिपादन पोलिस निरीक्षक एम. एन. वाघमोडे यांनी केले.

दत्ताजीराव कदम एएससी कॉलेजच्या वार्षिक पारितोषिक वितरण आणि विद्यार्थी गुणगौरव समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे प्रवक्ते उपमहाराष्ट्र केसरी पै.अमृत भोसले होते. एएससी कॉलेजचे विद्यार्थी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यश संपादन करत आहेत.

विद्यार्थी ध्येयाने प्रेरित झाले तरच त्यांना यश हमखास मिळते, असे मत पै. भोसले यांनी व्यक्त केले. प्रास्ताविक व स्वागत प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी केले. विविध क्षेत्रांत प्रावीण्य मिळवलेल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा पारितोषिक देऊन सत्कार केला. तसेच विद्यापीठ परीक्षेतील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांचा सन्मानही प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत केला. अहवालवाचन डॉ. डी. सी. कांबळे, मेजर मोहन विरकर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. अंजली उबाळे, प्रा. भारती कोळेकर, डॉ. अतिश पाटील यांनी केले. प्रा. अरुण कटकोळे यांनी आभार मानले. जिमखानाप्रमुख प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. प्रशांत कांबळे आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

सकाळ

सोमवार,
३० मे २०२२

# रिसेन्ट ॲडव्हान्सेस इन मॅथॅमॅटिकस् -२०२२ वर संमेलन

इचलकरंजी, ता.२९ : दत्ताजीराव कदम आर्टस् , सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयात रिसेन्ट ॲडव्हान्सेस इन मॅथॅमॅटिक्स -२०२२ या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय संमेलन झाले.

वरिष्ठ गणित विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षातर्फे आयोजित राष्ट्रीय संमेलनाचे उद्‌घाटन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे सहसंचालक (प्रशासक ) डॉ. आर. व्ही. शेजवळ यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. शिवाजी विद्यापीठाच्या गणित विभागप्रमुख डॉ. सरिता ठक्कर या बीजभाषिक म्हणून उपस्थित होत्या. ऑनलाइन पद्धतीने झालेल्या या संमेलनात विविध राज्यांतील सहभागी शिक्षक, संशोधक विद्यार्थ्यांनी १२ संशोधन पत्राचे सादरीकरण केले.

प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी स्वागत केले. डॉ. सागर सुतार यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सरिता ठक्कर, डॉ. व्ही. दानूमजाया (बिर्ला इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, गोवा), डॉ. किशोर कुचे (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर), डॉ. सचिन भालेकर (हैदराबाद युनिव्हर्सिटी) यांनी संमेलनात मार्गदर्शन केले. संशोधन पत्रिका सादरीकरण सत्राचे काम डॉ. एम. टी. गोफणे यांनी पहिले.

सांगता समारंभासाठी शिवाजी विद्यापीठाचे डॉ. एम. टी. गोफणे हे प्रमुख पाहुणे म्हणून, तर प्राचार्य डॉ. ढेकळे अध्यक्षस्थानी होते. सहभागी शिक्षक व विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. अतिश पाटील यांनी सूत्रसंचालन केले. गणित विभागप्रमुख प्रा. डी. जे. मुंगारे व डॉ. विनायक गाणबावले यांनी आभार मानले. डॉ. दीपक कुंभार यांचे तांत्रिक साहाय्य लाभले.

Scanned with CamScanner